दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
Scan QR code to visit... Epaper Portal
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २०७ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.०६ मे २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# निवडणुकीनंतर २ राजकीय पक्ष संपुष्टात येणार ; राजकारणात मोठे बदल होणार

## काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांचा खळबळजनक दावा

**मुंबई (वृत्तसंस्था)–लोकसभा निवडणुकीनंतर राज्याच्या राजकारणामध्ये मोठे बदल होताना दिसतील. राज्यातील २ राजकीय पक्ष लोप पावेल, या पक्षांचं अस्तित्व दिसणार नाही असा मोठा दावा काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. ते माध्यमांशी बोलत होते. त्यांच्या या दाव्याची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.**



याबाबत बोलताना ते म्हणाले, ''महाविकास आघाडीच्या बाजूने आणि नरेंद्र मोदींच्या विरोधात एक सुप्त लाट असून निवडणुकीचे टप्पे वाढत आहेत, तसतशी ती सुप्त लाट उघड व्हायला लागली आहे. त्यामुळे सर्वांना आश्चर्याचा धक्का बसेल, अशा प्रकारचा निकाल लागेल. शरद पवारांशी झालेल्या चर्चेत अपेक्षित नसणाऱ्या जागा देखील निवडून येतील, अशी माहिती समोर आली आहे. त्यामुळे महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये असलेल्या प्रत्येकी तीन म्हणजेच सहा पक्षांपैकी दोन पक्ष निवडणुकीनंतर संपुष्टात येतील. दोन पक्ष एकतर मर्ज होतील किंवा अस्तित्वात नसतील'', असा खळबळजनक दावा चव्हाण यांनी केला आहे.यावेळी चव्हाण यांनी भाजपवर देखील जोरदार टीका केली आहे. ''प्रचाराची पातळी फारच खाली गेली आहे. उमेदवार आणि प्रचारकांच्या पातळीवर ते समजून घेता आले असते, पण पंतप्रधानांनी प्रचाराची पातळी खाली नेली, हे आश्चर्यकारक आहे. लोकांच्या मुद्यावर चर्चा करण्याऐवजी ते वैयक्तिक टीकाच जास्त करताना दिसत आहेत. शरद पवारांबद्दल पंतप्रधान भटकती आत्मा म्हटल्यानंतर भाजपाला मोदींचे फोटो असलेले पोस्टर्स काढावे लागले. इतका लोकांमध्ये राग आहे'', असा हल्ला त्यांनी चढवला.याशिवाय उदयनराजेंबद्दल बोलताना पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, त्यांना आम्ही तीन वेळा राष्ट्रवादीच्या चिन्हावर निवडून दिले, मात्र मागच्या निवडणुकीत त्यांनी भाजपाला साथ दिली आणि पोटनिवडणुकीमध्ये आम्ही त्यांचा ९० हजार मतांनी पराभव केला. दोन पक्ष असताना त्यांचा ९० हजार मतांनी पराभव झाला होता. पण आता तीन पक्ष आहेत, त्यामुळे किमान दीड लाख मतांनी त्यांचा पराभव होईल. दक्षिण भागातील उमेदवार साताऱ्यात चालतो, पण यावेळी दोन्ही उमेदवार हे उत्तर भागातले आहेत, त्यामुळे उदयनराजेंचा पराभव निश्चित होईल'', असा विश्वास पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केला.

## कधी पावसात भिजायचं, कधी रडायचं याने निवडणुका जिंकता येत नाहीत:मंत्री गिरीश महाजन

**जळगाव**–कधी पावसात भिजल्याने किंवा रडल्याने निवडणूका जिंकता येत नाहीत, मतदारांना तुम्ही किती दिवस भावनिक करसाल, कधी तरी विकासावर मत मागा, असा खोचक टोला गिरीश महाजन यांनी आमदार रोहित पवारांना लगावला.बारामतीमध्ये रविवारी सुप्रिया सुळे यांच्या प्रचार सांगता सभेत बोलताना रोहित पवार भावुक झाले होते, त्यासभेवर बोलताना गिरीश महाजन यांनी शरद पवारांसह रोहित पवारांवर निशाणा साधला.गिरीश महाजन यांनी पुढे बोलताना पुन्हा उद्धव ठाकरेंवर प्रहार केला. ते म्हणाले की, उद्धव ठाकरे किती वर्ष आमच्या सोबत होते. त्यावेळी उद्धव ठाकरेंना सर्व गोड वाटलं का? ज्यावेळी सोबत होते त्यावेळी उद्धव ठाकरे हे नरेंद्र मोदींचे कौतुक करत होते. आता विरोधात गेले म्हणून काहीही बोलावं का?, आमच्या भरवशावरच तुमच्या १८ जागा निवडून आल्या. शिवसेनेचे खासदार, आमदार कुणाच्या भरशावर निवडून आले होते? आम्ही नसतो तर १५ आमदार तरी उद्धव ठाकरे यांना निवडून आणता आले असते का? याचे उत्तर उद्धव ठाकरेंनी द्यावं.मंत्री गिरीश महाजन यांनी शरद पवारांसह रोहित पवारांवर टीका केली. ते म्हणाले की,



कधी पावसात भिजायचं, कधी रडायचं, कधी आजारी पडायचं हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. शरद पवारांची तब्येत खराब असते, त्यांच्या तब्येतीवर बोलणं उचित होणार नाही.मात्र रोहित पवार हे थोडं काही झालं की लगेच रडायला लागतात. मला वाटतं रडून निवडणुका लढता किंवा जिंकता येत नाहीत. तुम्ही फार वेळ मतदारांना भावनिक करू शकणार नाहीत. मला असं वाटतं की त्यांनी मुद्द्यावर बोलावं, विकासावर बोला कामावर बोलावं आणि त्यावरच मग मागितली पाहिजे.गिरीश महाजन म्हणाले की, संजय राऊत यांच्या जिभेला कुठलेही हाड नाही. कोणी स्वप्नातही विचार करू शकत नाही असं संजय राऊत बोलतात. संजय राऊत यांच्या बोलण्याला आता मी महत्त्व देत नाही. जनता ही संजय राऊत यांच्या बोलण्याला महत्त्व देत नाही. आनंद दिघे यांच्याकडून पद घेण्याचा उद्धव ठाकरेंचा डाव होता असा गौप्यस्फोट एकनाथ शिंदे यांनी केला आहे. त्यावर बोलताना गिरीश महाजन म्हणाले की, एकनाथ शिंदे सांगत आहेत तर त्यात तथ्य असणारच आहे.एकनाथ खडसेंकडून रक्षा खडसेंचा प्रचार सुरू आहे. एकनाथ खडसेंच्या भाजप प्रवेशावर मात्र गिरीश महाजन यांनी चुप्पी साधली. एकनाथ खडसे हे रक्षा खडसे यांचा प्रचार करत आहेत हे चांगलं आहे. खडसेंच्या भाजप प्रवेशाबाबत माहिती नाही, माहिती मिळाल्यावर त्यावर नक्की बोलेन, असे म्हणत त्यांनी खडसेंना देखील टोला लगावला.

## विजय वडेट्टीवारांविरुद्ध भाजपची निवडणूक आयोगाकडे तक्रार

**मुंबई**–काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी देशद्रोही आणि पाकिस्तान समर्थनात केलेले वक्तव्य आणि निवडणूक आचारसंहितेच्या उल्लंघनाविषयी चौकशी करुन त्यांच्यावर भादंविअंतर्गत गुन्हा दाखल करण्याबाबतची मागणी करणारे पत्र भारतीय जनता पार्टीने आज मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना दिले. वडेट्टीवार यांनी केलेल्या विधानाबाबत गंभीर चिंतेची बाब निदर्शनास आणून देण्यात येत आहे, असे पत्रात म्हटले आहे.

काँग्रेस नेते तथा राज्याच्या विधानसभेचे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी आयपीएस अधिकारी दिवंगत हेमंत करकरे यांना दहशतवाद्याने गोळ्या घातल्या नाहीत. तर आरएसएस समर्थित पोलिस अधिकाऱ्याने ते कृत्य केल्याचा निराधार दावा करून मतदारांची दिशाभूल करण्याची आणि अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. वडेट्टीवार यांनी करकरे यांच्या मृत्युमागे भारतीय जनता पक्षाचे मुंबईतील उमेदवार उज्ज्वल निकम यांना दोषी ठरवून त्यांची व पक्षाची देखील बदनामी केली आहे, असे मत भाजपने दिलेल्या तक्रारीत मांडले आहे.२६/११ मुंबई अतिरेकी हल्ला केस (अजमल कसाब) याची प्रथम सुनावणी विशेष



न्यायालयासमोर झाली व सर्व पुरावे, साक्षी तपासून न्यायालयाने आरोपी अजमल कसाब यास फाशीची शिक्षा दिली. त्यानंतर आरोपी अजमल कसाब याला कन्फर्मेशन केस उच्च न्यायालयात दाखल केली. या अपीलामध्ये सुनावणी होऊन अजमल कसाब याची फाशी कायम केली व सर्वोच्च न्यायालयानेही अजमल कसाब याची फाशी कायम केली. त्यामुळे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी जे देशद्रोही विधान केले आहे ते पूर्णपणे चुकीचे आहे व न्यायालयाचा अवमान देखील आहे.भाजपाच्या निवडणूक विधी विभागाचे सहसंयोजक ड. शहाजीराव शिंदे, ड. मनोज जायस्वाल यांनी राज्य मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, वडेट्टीवार यांच्या आरोपांमध्ये पुराव्यांचा अभाव तर आहेच पण राजकीय प्रतिस्पर्ध्याच्या प्रतिष्ठेला कलंकित करण्यासाठी ते राजकीयदृष्ट्या प्रेरित असल्याचेही दिसते. अशा कृती निष्पक्ष प्रचाराच्या तत्त्वांचे उल्लंघन करतात आणि निवडणूक आचारसंहितेचा भंग करतात.अशी विधाने केवळ आपल्या सशस्त्र दलांच्या व पोलिसांच्या कर्तृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचा प्रयत्न केला आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या संवेदनशील मुद्यांचे राजकारण करतात. या व्यतिरिक्त, लोकशाही प्रक्रियेची अखंडता टिकवून ठेवण्यासाठी, निवडणूक चर्चा नागरी आणि तथ्यात्मक राहील याची खात्री करण्यासाठी योग्य कारवाई केली पाहिजे असा दावा करून कारवाईसाठी या तक्रारीच्या प्रती निवडणूक निर्णय अधिकारी, २९–मुंबई उत्तर मध्य लोकसभा मतदारसंघ, पोलीस महासंचालक,पोलीस आयुक्त, मुंबई व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मरीन लाईन्स, पोलिस ठाणे यांनाही दिल्या आहेत.

## मला इंग्रजी बोलता येत नाही:शशी थरूर यांच्यासमोर धंगेकर यांचे प्रामाणिक उत्तर

### साधेपणाचे कौतुक होताच झाला टाळ्यांचा कडकडाट

**पुणे**–मला इंग्रजी बोलता येत नाही असे सहजपणे पुणे लोकसभेसाठी महाविकास आघाडीचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांनी एका कार्यक्रमात सांगून टाकले. विशेष म्हणजे समोर उभे असलेल्या शशी थरूर यांनीही त्यांच्या या साधेपणाचे कौतुक केले आहे. पुण्यातील एका कार्यक्रमात हा संपूर्ण प्रकार घडला आहे. याचा व्हिडिओही समोर आला आहे. सर्वत्र धंगेकर यांच्या साधेपणाचे कौतुक केले जात आहे.

काँग्रेस नेते शशी थरूर यांचा युवा संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला तरुणांनी मोठी गर्दी केली होती. अनेक तरुणांच्या प्रश्नांना शशी थरूर यांनी अगदी अभ्यासपूर्ण उत्तर देत होते. दरम्यान




पुणे लोकसभेसाठी महाविकास आघाडीचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली. यावेळी हा संपूर्ण प्रकार घडला.यावेळी झालेल्या भाषणात धंगेकर म्हणाले की, या कार्यक्रमाला मी आलोय. कारण शशी थरूर साहेब याठिकाणी आले आहेत. पण माझी पदयात्रा असल्यामुळे मला लवकर जावे लागत आहे. शिवाय मला इंग्रजी बोलता येत नाही असे सहजपणे धंगेकर यांनी मान्य केले. यालाच उत्तर देताना शशी थरूर यांनी ज्यांचे मन साफ असेल त्याला कुठल्याच भाषेमध्ये अडचण येऊ शकत नाही असे म्हंटले आणि सभागृहात टाळ्यांचा एकच कडकडाट पाहायला मिळाला.दरम्यान, पुण्यात आता महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी थेट लढत होणार आहे. भाजपने महापौर मुरलीधर मोहोळ यांचे नाव जाहीर केल्याच्या काहीच दिवसात आता महाविकास आघाडीने रवींद्र धंगेकरांचे नाव जाहीर केले आहे. त्यातच वंचितकडून मनसेला रामराम केलेले वसंत मोरे देखील रिंगणात आहेत. त्यामुळे इथे तिहेरी लढत होणार आहे.

## राजू शेट्टी यांनी सांगितले उद्धव ठाकरे यांची ऑफर नाकारण्याचे कारण

**हातकणंगले**–हातकणंगले लोकसभा मतदारसंघात उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांना पाठिंबा जाहीर करण्यात येईल, अशी शक्यता आधी वर्तवली जात होती. मात्र, अचानकपणे उद्धव ठाकरे गटाने राजू शेट्टी यांच्या विरोधात उमेदवार दिल्याने या मतदारसंघाबाबत राज्यात चांगलीच चर्चा रंगली होती. आता या मतदारसंघात उद्या मतदान होत आहे. राजू शेट्टी यांनी लोकसभा निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे यांनी दिलेली ऑफर आणि आपल्याकडून दिला गेलेला नाकार याबाबत सविस्तर खुलासा केला आहे.



आपण महाविकास आघाडीकडे हातकणंगले लोकसभा मतदारसंघात पाठींबा देण्याची मागणी केली नव्हती. मात्र, महाआघाडीचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी वारंवार या मतदारसंघात राजू शेट्टी यांना पाठिंबा देणार असल्याचे जाहीर करत होते. आपण एकदाच उद्धव ठाकरे यांची भेट घेतली होती. या भेटीत त्यांना तुमच्या गद्दाराला पराभूत करण्यासाठी माझ्या विरोधात उमेदवार देऊ नका, असे सांगितले होते. त्यासाठी उद्धव ठाकरे यांनी देखील तशी तयारी दर्शवली होती. मात्र, उमेदवारी यादी जाहीर होण्याच्या आदल्या दिवशी उद्धव ठाकरे यांनी मला मशाल या चिन्हावर लढण्याची ऑफर दिली. मात्र, मी तसा निर्णय घेतला असता तर मला शेतकरी चळवळीवर पाणी सोडावे लागले असते. ते मला मुळीच करायचे नव्हते, असा खुलासा राजू शेट्टी यांनी केला आहे.हातकणंगले लोकसभा म्हणजेच पूर्वीचा इचलकरंजी लोकसभा मतदारसंघ आहे. अनेक वर्ष काँग्रेस आणि त्यानंतर राष्ट्रवादीने या मतदारसंघावर राज्य केले. बाळासाहेब माने, त्यांची सून निवेदिता आणि आता त्यांचे नातू धैर्यशील माने... माने घराण्याने हातकणंगले लोकसभा मतदारसंघावर नेहमीच वर्चस्व राखले आहे. तत्पूर्वी, २००९ ते २०१९ पर्यंत या मतदारसंघाचे राजू शेट्टी यांनी नेतृत्व केले. हातकणंगलेत मविआकडून माजी आमदार सत्यजित पाटील यांना उमेदवारी देण्यात आल्याने या मतदारसंघात तिहेरी लढत होणार आहे.

## राज ठाकरे कोत्या नव्हे तर मोठ्या मनाचे व्यक्ती!:शिंदेंकडून मनसेचे कौतुक

**ठाणे**–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज ठाकरे यांचे कौतुक करत उद्धव ठाकरे यांना टोला लगावला आहे. राज ठाकरे हे मोठ्या मनाचे व्यक्ती असून कोत्या मनाचे नसल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आले. मनसेचे पदाधिकारी महायुतीचा प्रचार मनापासून करत असल्याचेही एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. ठाणे लोकसभा मतदारसंघात महायुतीच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.


राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार उभे आहेत. पहिल्या दोन टप्प्यांमध्ये महायुतीला प्रचंड यश मिळेल अशी परिस्थिती असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. पहिल्या टप्प्यातील मतदानात महायुती प्रचंड मताधिक्याने विजयी होणार आहे, असे मी खात्रीने सांगू शकतो, असे देखील मुख्यमंत्री यांनी म्हटले आहे. सर्व कार्यकर्ते अतिशय मनापासून काम करत आहेत. एवढा कडक उन्हाळा असून देखील कार्यकर्ते मतदारांना केंद्रापर्यंत आणत असल्याचे मी पाहिले, असे देखील मुख्यमंत्री यांनी म्हटले आहे.उन्हामुळे पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यामध्ये मतदानाची टक्केवारी कमी झाली आहे. मात्र, आता पुढील टप्प्यांमध्ये मतांचा टक्का वाढवण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. पन्ना प्रमुख, गटप्रमुख सर्वांनी सर्व प्रमुख पदाधिकारी यांनी देखील मतदान करून घेण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

# संगीतशास्त्रात निपुण असे पं.तानसेन!

**कलाकारांना धर्म नसतो असं म्हणतात. त्यांची कला हाच त्यांचा धर्म असतो, पण काही कलाकारांनी इतिहासात आपली अशी काही छाप सोडली आहे की, त्यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दलही आपल्या मनात कुतूहल निर्माण होतं आणि आपण त्याची माहिती शोधून काढतो. बापू– श्रीकृष्णदास निरंकारी यांचा सदर संकलित लेख अवश्यच आपल्या ज्ञानात भर घालेल... संपादक.**

अकबराच्या दरबारातील रत्न म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तानसेन बद्दल अशीच एक चकित करणारी माहिती इतिहास अभ्यासकांनी उपलब्ध करून ठेवलेली आहे. नावावरून आणि आजवर ऐकलेल्या कथांवरून तानसेन ही व्यक्ती मुस्लिम धर्मीय असावी, असा बहुतांश लोकांचा अंदाज आहे, पण आपल्या गायन कलेने आणि उर्दूच्या अस्खलित उच्चाराने अकबर राजा आणि दरबाराला प्रभावित करणारा हा गायक हिंदू धर्मात जन्माला आलेला होता, अशी माहिती एका इतिहास अभ्यासकाने लिहून ठेवलेली आहे. तानसेन हे एक श्रेष्ठ भारतीय गायक होत. संगीतक्षेत्रात अलौकिक अशा गणल्या गेलेल्या या कलावंताबद्दल जितके चमत्कार आणि दंतकथा प्रचलित आहेत, त्या मानाने त्याचे अधिकृत चरित्र असे कोठे नोंदले गेलेले नाही. त्याचे जन्मवर्ष १५०६, १५२६, किंवा १५३१–३२ असेही दर्शविले जाते. तानसेनचे मूळ नाव रामतनू किंवा तन्नामित्र असे होते. ग्वाल्हेरजवळ बेहट या गावी त्याचा जन्म झाला. त्याचे वडील मकरंद पांडे हे गौड ब्राम्हण, संस्कृत पंडित व उत्तम गायक होते. त्यांच्यामुळे त्याला लहान वयातच गाण्याची गोडी लागली. तानसेनची ग्रहणशक्ती पाहून वृंदावनचे संत स्वामी हरिदास यांनी तानसेनला गाणे शिकवले.

आरंभी ग्वाल्हेर येथे दरबारात राहिल्यावर आणि गायक म्हणून प्रतिष्ठा प्राप्त केल्यावर तो रीवा नरेश, रामचंद्र बाघेला यांच्या दरबारांत गायक म्हणून राहिला. तेथून सन १५६२च्या सुमारास तानसेन अकबर बादशाहाच्या दरबारात आले. अकबरच्या दरबारात येण्यापूर्वीच सर्वोत्कृष्ट गायक म्हणून त्यांची ख्याती पसरलेली होती. अकबराने त्यांना विशेष सन्मान देऊन संगीतसम्राट तानसेन म्हणून गौरविले आणि आपल्या दरबारी नवरत्नांमध्ये त्यास स्थान



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.

दिले. पुढे तानसेन हे संगीतक्षेत्रातील एक अद्भूत चमत्कार म्हणून ख्याती पावले. तानसेन हे धृपद गायक होते. शिवाय त्यांनी स्वतः रचलेली अनेक धृपदेही प्रसिद्ध आहेत. रागकल्पद्रुम या ग्रंथात तानसेनने रचलेली अनेक धृपदे आढळतात. त्यांनी व्रज भाषेत आपली पद्यरचना केली.

तानसेनचा जन्म इ.स.१५३२मध्ये मध्यप्रदेश मधील बेहट, ग्वाल्हेर येथे एका ब्राम्हण घरात झाला होता. त्याचं खरं नाव रामतनू पांडे असं होतं. त्याच्या वडिलांचं नाव मुकुंदराम पांडे असं होतं. मुकुंदराम पांडे हे एक कवी आणि संगीतकार होते. काही काळ त्यांनी वाराणसीच्या मंदिरात प्रवचनकार म्हणून काम केलं होतं. तानसेनने गाण्याचं शिक्षण आपल्या वडिलांकडून घेतलं होतं. रामतनू हा मुकुंदराम पांडे यांचा एकुलता एक सुपुत्र होता. त्याच्या जन्माची एक कथा आहे. मुकुंद पांडे हे ग्वाल्हेरच्या मोहम्मद गाऊस यांच्या गायकीचे चाहते होते. व्यक्ती म्हणून देखील मुकुंदराम हे मोहम्मद गौस यांचा खूप आदर करायचे. एका भेटीत मुकुंदराम यांनी गौस यांना आपल्याला आपत्य नसल्याची खंत व्यक्त केली होती आणि अशी विनंती केली होती की, आपणही आम्हाला मुलगा व्हावा यासाठी देवाकडे प्रार्थना करावी. मोहम्मद गौस यांची प्रार्थना देवाने ऐकली आणि मुकुंदराम यांना मुलगा झाला. मुकुंदराम पांडे तो ५ वर्षांचा झाल्यावर आपल्या मुलाला मोहम्मद गौस यांच्याकडे आशीर्वाद घेण्यासाठी घेऊन आले होते. भेटी दरम्यान, आपल्या मुलाने सुद्धा शास्त्रीय गायक व्हावं अशी इच्छा मुकुंदराम यांनी मोहम्मद गौसकडे व्यक्त केली. मोहम्मद गौस हे तेव्हा विड्याचं पान खात होते. शिष्य म्हणून नेमणूक करण्याच्या हेतूने मोहम्मद गौस यांनी आपल्या तोंडातील लाळ बोटाने काढली आणि ती त्यांनी रामतनू पांडेच्या तोंडामध्ये ठेवली. मोहम्मद गौस यांनी त्या दिवसापासून रामतनू पांडे याचा शिष्य म्हणून स्वीकार केला आणि त्यांनी रामतनूचा आपल्या मुलाप्रमाणे सांभाळ केला.

तानसेनला दोन बायका असून सुरतसेन, सरतसेन, सरस्वती ही हिंदू पत्नीची मुले आणि तानरंगखाँ व बिलासखाँ ही हुसेनी नामक मुस्लिम उपपत्नीची मुले असे समजले जाते. सरस्वतीचा विवाह मिश्रीसिंग (नौबतखाँ) नावाच्या बीनकाराबरोबर झाला आणि मुलीकडूनचा त्याचा बीनकारांचा वंश सेनिया म्हणून प्रसिद्धीस आला. मुलाकडूनची सेनिया परंपरा रामपूरची असून हे कलावंत धृपद गायक होते. तानसेनने स्वतः अनेक नवीन रागांची निर्मिती केली असून मियाँ की तोडी, मियाँ की मल्हार, दरबारी कानडा, मियाँ की सारंग वगैरे राग तानसेनची निर्मिती म्हणून मानली जाते. दीपक राग गाऊन अग्नी प्रज्वलित करणे, मल्हार गाऊन पाऊस पाडणे, तोडी गाऊन हरणे बोलावणे, बैजू बावराशी स्पर्धा, तानारिरिचा प्रसंग वगैरे अनेक चमत्कृतीपूर्ण आख्यायिका तानसेनच्या जीवनाशी जोडल्या जातात. सुप्रसिद्ध वैष्णव संत गोविंदस्वामी यांच्या बरोबरच्या आख्यायिकाही प्रचलित आहेत. संत सूरदास आणि पंडित जगन्नाथराम हेदेखील तानसेनच्या सहवासात आले होते, असे मानले जाते. संगीताच्या दृष्टीने तानसेनची धृपद गायकी ही गौडी, गोहरबानी म्हणून समजली जाते. संगीत सार व रागमाला हे दोन ग्रंथ त्याच्या नावांवर दाखवले जातात. अबुल फज्लने अकबरनाम्यात तानसेनाचे वर्णन असा कलावंत हजार वर्षांत झाला नाही, असे केले आहे. तानसेनाची समाधी ग्वाल्हेर येथे मुहंमद घौस या अवलियाच्या दर्ग्याजवळ दाखवली जाते. त्या ठिकाणी दर वर्षी तानसेनच्या पुण्यतिथीला मोठा जलसा भरवला जातो व त्यात अनेक नामवंत गायक आपली सेवा रुजू करतात.

पं.तानसेन ऊर्फ रामतनु ऊर्फ तन्नामित्र, त्रिलोचन, तनसुख हे अकबराच्या दरबारातील प्रसिद्ध नवरत्नांपैकी एक रत्न होते. पं.तानसेन हे संगीतशास्त्रात निपुण होते. त्यांना मियां तानसेन असे सुद्धा म्हणत. पं.तानसेन यांच्या वडिलांचे नाव मकरंद पांडे होते. त्यांच्याकडेच पं.तानसेन यांनी प्रारंभिक शिक्षण घेतले. सुफी संत गौस मोहंमद यांचेही त्यांना मार्गदर्शन लाभले. संगीतसम्राट पं.तानसेन यांचे देहावसान दि.६ मे १५८९ रोजी झाले.

!! आज पं.तानसेन पुण्यस्मरण निमित्त त्यांना कोटी कोटी विनम्र अभिवादन !!


# भाजपचेच इंजिन बिघडल्यामुळे त्यांना मनसेचे इंजिन सोबत घ्यावे लागले

## शरद पवार–उद्धव ठाकरेंचे इंजिन सुसाट असल्याने ते घाबरले–जयंत पाटील

**सातारा (वृत्तसंस्था)**

शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचे इंजिन सुसाट चालले आहे. त्यामुळे विरोधकांच्या मनात धडकी भरली आहे की आपल्या १० ते १५ तरी जागा निवडून येतात का? भाजपचेच इंजिन बिघडल्यामुळे त्यांना मनसेचे इंजिन सोबत घ्यावे लागले, अशी बोचरी टीका जयंत पाटील यांनी सातारा येथे बोलताना केली आहे.

शशिकांत शिंदे हे संसदेत १०० टक्के हजेरी लावतील. मात्र विरोधात उदयनराजे भोसले हे ५ वर्षात फक्त ६ दिवस संसदेत गेले. लोकसभेत आणि राज्यसभेत आपण ज्यांना निवडून देतो ते जर हजर राहत नसतील, तर ते धक्कादायक आहे. पूर्ण वेळ उपलब्ध असणारा नेता, १०० टक्के हजेरी लावून आणि प्रश्न विचारू शकणारा उमेदवार आम्ही दिला असल्याची खोचक टीका जयंत पाटील यांनी केली आहे.जयंत पाटील म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार हे दुटप्पी भूमिका घेतात अशी टीका सातारा येथे केली होती. त्याला जयंत पाटील यांनी उत्तर देताना सांगितले कि, शरद पवार यांनी कधीही दुटप्पी भूमिका घेतलेली नाही. शाहू महाराजांना उमेदवारी घ्या म्हणून त्यांच्या मागे आम्ही लागलो होतो. तर उदयनराजेंना मात्र



दिल्लीला ताटकळत थांबावे लागले होते. उदयनराजे यांना मी सल्ला दिला असता उभे राहू नका. आधी शशिकांत शिंदे यांचे नाव जाहीर झाल्यानंतर उदयनराजे यांचे नाव जाहीर झाले आहे. त्यामुळे दुटप्पीपणा झालेलाच नाही, असे उत्तर जयंत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या टीकेला दिले आहे.जयंत पाटील म्हणाले की, भाजप सरकार शेतकरीविरोधी असून, जीएसटीच्या माध्यमातून जनतेच्या खिशातील पैसा लुटला जात आहे. भाजपने दहा वर्षांपूर्वी दिलेला शेतकऱ्यांना उत्पन्न दुप्पट करण्याचा शब्दही पाळला नाही. उलट शेतकऱ्यांचे कर्ज दुप्पट झाले असून, उत्पन्न निम्मे झाले आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली.चपलेपासून टोपीपर्यंत सर्व वस्तूंना १२ ते १८ टक्के जीएसटी वसूल केला जातो. शेततळ्यासाठी प्लास्टिक कागद खरेदीसाठी १८ टक्के जीएसटी द्यावा लागतो. घर चालविण्यासाठी ५० हजार रुपये खर्च केले, तर त्यातील नऊ हजार रुपये हे जीएसटीच्या माध्यमातून पुन्हा केंद्र व राज्य सरकारच्या तिजोरीत जातात, असा हिशेबही जयंत पाटील यांनी दिला. भाजपने मराठी माणसांचे दोन पक्ष फोडले. पक्ष फोडाफोडीचे राजकारण सुरू आहे, अशी टीकाही केली.

# विश्व नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी अहिल्या नगर मध्ये ७ मे ला विक्रमी सभा घेणार जय्यत तयारी

**अहमदनगर । दैनिक राज आनंद**

विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विजय संकल्प सभेची जय्यत तयारी महायुतीच्या वतीने करण्यात आली असून, प्रधानमंत्र्यांच्या स्वागतासाठी नगर शहर सज्ज झाले आहे. मागील लोकसभा निवडणूकीच्या वेळी याच मैदानावरुन मोदींनी संबोधित केले होते. या आठवणींना उजाळा देवून जिल्हयातील महायुतीच्या दोन्ही उमेदवारांच्या विजयाचा निर्धार पुन्हा एकदा या ऐतिहासिक सभेतून होणार आहे.



शहरातील निरंकारी भवना शेजारील मैदानावर मंगळवार दिनांक ७ मे २०२४ रोजी दुपारी १ वाजता ही सभा होणार आहे. महायुतीच्या वतीने नियोजन करण्यात येत आहे. या सभेला मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्यासह महायुती मधील घटक पक्षांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील महायुतीचे उमेदवार खा.डॉ.सुजय विखे पाटील आणि शिर्डी लोकसभा मतदार संघातील उमेदवार सदाशिव लोखंडे यांच्या निवडणूक प्रचारार्थ या महासंकल्प विजय सभेचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी मैदानावर भव्य सभामंडप उभारण्यात आला असून, १ लाख नागरीकांच्या बसण्याची व्यवस्था या मंडपात करण्यात आली असून, उन्हाची तिव्रता लक्षात घेवून सभामंडपामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या सभेचे नियोजन करण्यात येत असून शहरातील महायुतीचे सर्व पदाधिकारी सभेच्या यशस्वीतेसाठी नियोजनय करीत आहेत.भव्य अशा स्टेजवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आगमन झाल्यानंतर ते उपस्थितांना मार्गदर्शन करतील. महायुतीच्या वतीने प्रधानमंत्र्यांचा भव्य सत्कारही करण्यात येणार असून, ठिकठिकाणी महायुतीचे झेंडे, फ्लेक्स बोर्ड लावून या सभेची वातावरण निर्मिती करण्यात आली आहे. संपूर्ण जिल्ह्यातून या सभेला नागरीक येणार असल्याचे चौदा वेगवेगळ्या ठिकाणी वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली आहे. यापुर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी शिर्डी येथे महाआवास योजने अंतर्गत घरकुल वितरण कार्यक्रम १९ ऑक्टोंबर २०१८ रोजी तसेच मागील लोकसभा निवडणूकीत डॉ.सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ दि. १२ एप्रिल २०१९ रोजी आणि निळवंडे धरणातून पाणी सोडण्याचा शुभारंभ करण्यासाठी २६ ऑक्टोंबर २०२३ रोजी जिल्ह्यात आले होते.आता चौथ्यांदा प्रधानमंत्र्याचा होत असलेला दौरा लोकसभा निवडणुकीच्या निमिताने महत्वपूर्ण असून या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.

# महायुतीचे उमेदवार पियुष गोयल यांच्या प्रचार रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**मुंबई । दैनिक राज आनंद**

येत्या २० मे रोजी लोकसभेच्या निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी मुंबईत मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर आज उत्तर मुंबईचे भाजपा महायुतीचे लोकप्रिय उमेदवार पियुष गोयल यांची प्रचार रॅली काढण्यात आली. या प्रचार रॅलीला नागरिकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी नागरिकांनी पियुष गोयल यांच्या समर्थनार्थ 'जय श्रीराम'चा जयघोषही केला.

आज सकाळी एस. एन. दुबे रोड जवळील हनुमान मंदिरात बजरंगबलीचे दर्शन घेऊन पियुष गोयल यांनी प्रचार रॅलीला सुरुवात केली. ठिकठिकाणी प्रचार रॅलीच्या निमित्ताने पियुष गोयल यांचे फटाक्यांची आतिषबाजी करत, फुलांची उधळण, पुष्पहार घालून नागरिकांकडून जंगी स्वागत करण्यात आले. पियुष गोयल यांनीही हात उंचावून अभिवादन करत ज्येष्ठासह नागरिकांचे आशीर्वाद स्वीकारले. ज्ञानेश्वर नगर, कोंकणीपाडा, सूर्योदय सोसायटी, कामत हॉटेल, विद्याभूषण शाळा, मारुती मंदिर, श्रीनाथ नगर, वीरसावरकर नगर, महिंद्रा नेन्सी कॉटेज, या ठिकाणाहून ढोल ताशाच्या गजरात निघालेल्या या प्रचार रॅलीची शांतीवन बोरिवली (पूर्व) येथे सांगता झाली.

याप्रसंगी भाजपा विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकर, खासदार गोपाळ शेट्टी, शिवसेना आमदार प्रकाश सुर्वे, मुंबई भाजपा उपाध्यक्ष प्रकाश दरेकर यांसह महायुतीतील घटक पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# ब्राह्मण महासंघाचा मोफत वधू–वर मेळावा उत्साहात

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

अखिल भारतीय ब्राहमण महासंघ छत्रपती संभाजीनगरतर्फे सातवा मोफत वधू – वर मेळावा सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत पार पडला.शनिवारी झालेल्या मेळाव्यात ३३३ मुले, मुलींनी सहभाग घेतला. दरम्यान पालकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. दरम्यान तब्बल ९७ मुली झाल्या होत्या. सर्वप्रथम दीपपूजन तरुण उद्योजक सोडवणूक या नाटकाचा मुख्य अभिनेता अभिषेक देशपांडेसह रविंद्र मगर, ॲड. विश्वेश घाणेकर, प्रख्यात ज्योतिषकार मोहन पुर्णपात्रे गुरुजी (भाजप उद्योजक आघाडी महाराष्ट्र उपाध्यक्ष) सुधीर नाईकसह डॉ. गीता आचार्य यांच्या हस्ते पार पडला. पाहुण्याचे स्वागत महिला जिल्हाध्यक्षा सुचेता पालोदकर, सचिव संजय टोणपे, डॉ. मयुरी कुलकर्णी, मोहन काळे, अंजली देशपांडे, दीपक कुलकर्णी, स्मिता नगरकर, ॲड. अश्विनी कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक यांनी केले. त्यानंतर गुरजींनी विचार मांडले. यानंतर अभिषेक देशपांडे यांनी विचार मांडले. प्रा. रवींद्र मगर यांनी मोलाचे विचार मांडून नवी दिशा दाखवली. अजिंकल ड. विश्वेश घाणेकर यांनी विचार मांडून सर्वांची मन जिंकली.

त्या नंतर मुला मुलींनी आपला जोडीदार कसा असावा असे सांगितले. मेळाव्यात हैद्राबाद, गुलबर्गा (कर्नाटक) पुणे, नागपूर, वसमत, नांदेड, परभणी, जळगाव, नगर, पुसद, लातूर, धाराशिव, बीड, किनवट, आदी सह जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातून मुल मुली व त्यांचे पालक उपस्थित होते. आजपर्यंतचे सर्व उचांक मोडणारा मेळावा ठरला. असे यावेळी मत व्यक्त केले. धन्यवाद समाज बंधूनो शत शहा आभार मानले. या मेळाव्याला समन्वय सामितीचे अध्यक्ष मिलिंद दामोदरे, आनंद तांदुळवाडीकरसह या वर्षीच्या प्रकल्पप्रमुख डॉ. गीता आचार्य, अनघा कुलकर्णी यांनी आपली उपस्थिती लावली. मेळावा यशस्वी करण्यासाठी ॲड. नरेंद्र देव, माणिक रत्नपारखी, दिलीप लाड, संदीप बेदरकर, सुरेखा पारवेकर, अंजली गोरे, किशोर कांनडगावकर, सुहास ठोसर, अंजली, शुभम कुलकर्णी, सरोज जोशी, चंद्रशेखर देशपांडे, श्रीनिवास व प्रसाद लीगडे ह्यांचे बहुमोल सहकार्य लाभले. आभार प्रदर्शन सुचेता पालोदकर यांनी केले.

# मंदिराच्या नावाने ओपन स्पेस मधील जागा हडपण्यासाठी धडपड

## श्रमिक नगर वॉर्ड नं .१४ मधील प्लॉट धारकांनी केली प्रशासनाकडे मागणी

**मुल । प्रतिनिधी**

मुल नगरातील सर्व्हे नं. ९४ (श्रमिक नगर वार्ड क्रं. ०८) मध्ये चालु असलेले ओपन स्पेस मधील जागा मंदिराच्या नावाखाली हाडपून त्यावर अवैद्य बांधकाम करण्यासाठी चालविलेली धडपड त्वरित थांबवावी अशी मागणी नगर परिषद प्रशासन मुख्याधिकारी यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे श्रमिक नगर मधील अधिकृत प्लॉट धारकांनी केली आहे.श्रमिक नगर वार्ड क्रं.८, सर्वे नं. ९४ मध्ये एकूण ९० प्लॉटधारक असून त्यात २९९२ स्के. मीटर एवढा ओपन स्पेस आहे. शासकीय नियमाप्रमाणे ओपन स्पेस मध्ये फक्त १० ते १५ टक्के एवढेच बांधकाम करायचे असते. परंतु या ठिकाणी अगोदरच ओपन स्पेस मध्ये मंदिर २५०० स्के. फुट, एक सभागृह-२००० स्के. फुट, एक स्वयंपाकगृह ५०० स्के. फुट, एक शौचालय व अतिक्रमीत शाळेच बांधकाम झालेले आहे. तरी पुन्हा उर्वरीत जागेवर





मंदिराच्या नावाने सभागृह अंदाजे ५००० स्के. फुटचे अवैध बांधकाम सुरु करुन जागा हडपण्याचा गैरप्रकार राजरोसपणे सुरु केले आहे. जर असे गैरकायदेशिर बांधकाम सुरु राहिल्यास लेआऊट मधील मुळ प्लॉटधारकांना हक्काची जागा व त्यांचे मुलांना खेळण्याकरीता तसेच वयोवृध्द व्यक्तीकरीता मनमोकळे फिरण्यासाठी जागाच शिल्लक राहणार नाही. आणि सर्वांच्या हक्काच्या जागेवर स्वातंत्र्य हिसकाविण्याचा प्रयत्न चालविला आहे.

वस्तुस्तीती पाहिली असता असे लक्षात येते की, मंदिराच्या नावाने जागा हडपून, अधिकार गाजवून जागा ताब्यात घेण्याचे षडयंत्र सुरु आहे. करीता मागील फेब्रुवारी महिण्यात ओपन स्पेस डेव्हलपमेंट करुन त्यात ग्रीन जिम, ट्रॅक, बगीचा संपूर्ण सौंदर्याकरण करण्यात यावे असे निवेदन यापूर्वि सुद्धा प्रशासनाला देण्यात आलेले आहे. तरी देखील नगर परिषद प्रशासन अजूनही जागे झाले नाही. त्यामुळे आम्हा प्लॉट धरकावर होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात पुढील पाऊल उचलण्यास प्रशासन आम्हाला जागे करीत असल्याचे दिसून येत आहे. जर का अनधिकृत मंदिराचा मुद्दा पुढे करून जागा हाडपण्याचा प्रकार होत असेल तर ते खपऊन घेतले जाणार नाही असा इशारा देण्यात येईल असे निवेदन कर्त्यानी बोलून दाखविले आहे.



नागभीड तालुक्यातील गोवारपेठ रस्त्यावर पिवळ्या रानफुलांनी सजलेले बाहवा या वनस्पती जातीचे झाड.छाया :प्रणय बांगरे.

# संत गोरोबाकाका भक्तिमार्गाचे महामेरू-ह.भ.प.शिरसकर महाराज

**पुलगाव । प्रतिनिधी**

संत गोरोबाकाका हे भक्ती मार्गाचे महामेरू आहेत. भक्तीमध्ये तल्लीन झाले असताना पुढचा गोळा पायाखाली तुडविला गेला, पण त्यांना भान नव्हते. त्याच भक्तीच्या माध्यमातून गोरोबाकाकांनी त्याला पुनर्जन्म दिला. समाजातील कष्टकरी बांधवांमध्ये भक्तिमार्ग रुजवण्याचे कार्य संत गोरोबा काकांनी केले, असे प्रतिपादन ह भ प शिरसकार महाराज यांनी केले.

संत गोरोबाकाका पुण्यतिथी निमित्ताने आयोजित कीर्तन कार्यक्रमात ते बोलत होते. स्थानीय हिंगणघाट पुढील परिसरात हनुमान मंदिराजवळ आयोजित संत गोरोबाकाका पुण्यतिथी कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता कलश स्थापनेने झाली. पवन गाते व वनिता गाते यांनी कलश स्थापना केली.

भाजपा ओबीसी मोर्चाने श्री गोरोबा काका पुण्यतिथी निमित्त हिंगणघाट फैल, कुंभार मोहल्ला येथे गोरोबा काका



यांच्या मूर्तीला माल्यार्पण करून वंदन व पुजन केले. याप्रसंगी भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष मंगेश झाडे, जिल्हा उपाध्यक्ष संदीप बोरकुटे, जिल्हा सचिव राजेश गुप्ता, अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश सचिव शकील खान, जिल्हा उपाध्यक्ष निसार खान,भाजपा महामंत्री रिचर्ड क्रॉस, ओबीसी शहर अध्यक्ष अनिल लेकुरवाळे, महामंत्री प्रशांत लोणकर, गणेश पाटणे, मानसिंग झाँझोटे, कन्हैया साहू, विजय ढगे, राहुल काळे, विक्की धांदे व पदाधिकारी उपस्थित होते.

दुपारी श्री कठीणमाता भजन मंडळाचा भजन कार्यक्रम झाला. सायंकाळी ह भ प पुरस्कार महाराज यांचे कीर्तन झाले. रात्री महाप्रसादाने कार्यक्रमांची सांगता झाली. दिवसभर संत गोरोबा काकांच्या दर्शनासाठी जनतेची रीघ लागली होती.

# पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत सेंट जॉन हायस्कूलचे घवघवीत यश

**पुलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतरिम निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. या शिष्यवृत्ती परीक्षेत पूर्व माध्यमिक विभागातून ( वर्ग ५) एकूण ९ विद्यार्थ्यांपैकी ३ विदयार्थी उत्तीर्ण झाले ह्यात अनन्या इमाने, सिद्धी पागोटे, कृपा देशपांडे हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर माध्यमिक (वर्ग ८) गटातून ४० पैकी १७ विदयार्थी अनुक्रमे सिद्धांत फुसाटे, ताहूर कुरेशी ,लावण्या गाढवे , दिग्विजय इंगोले, नारायणी चचाणे , अवधी धवणे , श्रेयस पाटील, अमेय खोडे क्षितिजा ताकसांडे, रुहानी खोबे, पूर्वा डहाके , हिमांशू पनपालिया, मिताली वैद्य, माही ढोले,प्राची दंतेवार, शिवांगी कुरझडकर, आनंदी रामगावकर इत्यादी विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

विशेष म्हणजे २०२२-२३ मध्ये झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत पूर्व माध्यमिक




गटातून(वर्ग ५) मधून अंशुमन गुल्हाने, सोहम टाके हे दोन विद्यार्थी तर वर्ग ८ (माध्यमिक गटातून)कृष्णप्रिया घोटेकर, श्रावणी बुल्ले, संस्कृती अवसरे, दिशा वर्मा, कार्तिक चव्हाण, पूर्वा गावंडे, मीत खुराना हे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेत.

विद्यार्थ्यांचे उत्कृष्ट यश ही खरोखरच शाळेसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी अतिशय अभिमानास्पद आणि कौतुकास्पद आहे बाब आहे .त्यांच्या या यशाबद्दल शाळेच्या अध्यक्षा प्रीती बोरसे ,शाळेचे प्रबंध संचालक चंद्रशेखर इंगळे, प्राचार्य संतोष यादव, उपप्राचार्या आरती कुरझडकर ,उपप्राचार्य महेंद्र भोयर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आणि त्यांचे मनोबल वाढवून भविष्याच्या वाटचालीसाठी मार्गदर्शन केले.

# भरधाव ट्रकच्या धडकेत युवकाचा मृत्यु

**मूल । प्रतिनिधी**

स्थानिक गांधी चौकातील आईसक्रीम दुकाना समोर मित्रांसोबत आईसक्रीम खात असलेल्या युवकाला भरधाव ट्रकने धडक दिल्याने युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना काल (५ मे) रात्री १० वा. सुमारास घडली. प्रज्योत नरेंद्र गेडाम वय २० वर्षे रा. चोरगाव असे मृत्तक युवकाचे नाव आहे तालुक्यातील आकापूर येथील देवनिल नर्सींग विद्यालयात नर्सींगचे प्रशिक्षण घेत असलेला प्रज्योत नरेंद्र गेडाम (२०) रा. चोरगांव ता. चंद्रपूर हा विद्यार्थी टेकाडी येथील काकाकडे राहुन आकापुर येथे नर्सिंगचे शिक्षण घेत होता. रविवारी जेवन केल्यानंतर आईस्क्रिम खायची इच्छा झाल्याने प्रज्योत आणि मुस्ताक अल्ली सय्यद (२१)दोघेही रा. टेकाडी या मित्रांसोबत मूल येथे आला. दरम्यान गांधी चौक येथील आईस्क्रीमच्या दुकाना मधुन आईस्क्रिम घेवुन मित्रांसोबत



खात असताना सिंदेवाही वरून चंद्रपूर कडे जाणारा ट्रक क्रं. एम एच ४० बि जी ८२६८ चे चालक मनोजकुमार व्दारकासींग तिवारी (५५) रा. नागपूर याचे ट्रक वरील नियंत्रण सुटल्याने त्याने दुकाना समोर उभा असलेल्या प्रज्योत नरेंद्र गेडाम याला जबर धडक दिली. घटनेच्या वेळेस ट्रक भरधाव वेगात असल्याने झालेल्या धडकेत प्रज्योत जागीच मृत्यु पावला. जवळपास असलेल्या नागरीकांनी इतरत्र पळापळ केली, जवळच असलेल्या एका ऑटोलाही ट्रकनी धडक दिली, मात्र ऑटोचे नुकसान झालेले नाही. मृत्तकाचे मूल येथील उपजिल्हा रूग्णालयात शवविच्छेदन करून शव नातेवाहीकांच्या सुपुर्द करण्यात आले.

आरोपी ट्रक चालकाविरूध्द पोलीस स्टेशन मूल येथे कलम २७९, ३३७, ३०४ (अ) भादवी, मुंबई पोलीस अँक्ट कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक सुमित परतेकी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक ठाकरे, पोलीस अंमलदार यशवंत कोसनशिले रफीक शेख करीत आहे.

# नॅशनल स्केटींग स्पर्धेत कास्य पदक पटकविणा-या श्रव्य घोडमारेचा आमदार किशोर जोरगेवार यांनी केला सत्कार

## हरियाणा येथील नॅशनल स्केटींग स्पर्धेत मिळविले यश



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

नॅशनल केअर फेडरेशनच्या वतीने हरीयाणा येथे आयोजित नॅशनल स्केटींग स्पर्धेत कास्य पदक मिळविणा-या १० वर्षीय श्रव्य चंद्रकांत गोडमारे याचा आमदार किशोर जोरगेवार यांनी त्याच्या घरी भेट देत त्याचा सन्मान केला आहे. यावेळी त्याचे वडील चंद्रकांत घोडमारे आणि आई श्रावणी घोडमारे यांची उपस्थिती होती.

नॅशनल केअर फेडरेशनच्या वतीने आयोजित नॅशनल स्केटींग स्पर्धा नुकतीच हरियाण येथील गुरूग्राम येथे संपन्न झाली. या स्पर्धेत देशभरातील स्केर्टर्स नी सहभाग घेता होता. यात चंद्रपूरातील १० वर्षीय श्रव्य नेही भाग घेतला होता. सर्वप्रथम दिल्ली येथे झालेल्या चाचणीत तो उत्तीर्ण झाला. त्यानंतर गुरूग्राम येथील नॅशनल स्पर्धेसाठी त्याला पात्र ठरविण्यात आले. यावेळी त्यांनी उत्कृष्ट प्रदर्शन करत कास्यपदक मिळविले आहे.

दरम्यान आमदार किशोर जोरगेवार यांनी बालाजी वार्डातील त्याच्या निवासस्थानी भेट घेत त्याने मिळविलेल्या यशाबद्दल त्याचा सन्मान केला आहे. चंद्रपूरात उत्तम दर्जाचे खेळाडू आहेत. विविध खेळ प्रकारात त्यांनी दमदार कामगीरी बजावली असून चंद्रपूरचे नाव लौकीक केले आहे. अशा खेडाळुंना प्रोत्साहित करण्यासाठी आपण आज श्रव्य ची भेट घेतली असल्याचे आमदार किशोर जोरगेवार यांनी याप्रसंगी सांगितले. तसेच चंद्रपूरात पुढच्या वर्षी आयोजित श्री माता महाकाली क्रिडा महोत्सवाच्या स्केटींग स्पर्धेत सहभागी होणार असल्याचे श्रव्य ने म्हटले आहे.

# खा.रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारार्थ शहरात पदाधिकारी ,कार्यकर्त्यांची पदयात्रा संपन्न

## महायुतीची पदयात्रा म्हणजे खा.रणजीतसिंह निंबाळकर यांच्या विजयाचा जयघोष





**सांगोला । प्रतिनिधी**

४३ माढा लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारार्थ सांगोला शहरात पदयात्रा काढण्यात आली. महायुतीमध्ये भाजप ,शिवसेना ,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी , राष्ट्रीय समाज पक्ष ,आरपीआय (आठवले गट ), रयत क्रांती संघटना, मनसे, व इतर घटक पक्षांचा समावेश आहे. ही पदयात्रा रविवार दि ५ मे रोजी सकाळी ९.१५ वाजता सांगोला शहरातील पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पदयात्रेस प्रारंभ करण्यात आला. शहरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले व या पदयात्रेचा समारोप महात्मा फुले चौक येथे महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. शहरातील मेन रोड, नगरपालिका व पुढे महात्मा फुले चौक असे मार्गक्रमण करीत महात्मा फुले चौक येथे महायुतीचे उमेदवार खासदार रणजीतसिंह निंबाळकर यांच्या विजयाच्या घोषणा देत सांगोला तालुक्यातील महायुतीचै नेते मंडळी ,सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते नागरिक, यांनी, पदयात्रेत सहभाग नोंदवला . सांगोला शहरातील या , पदयात्रा प्रचार दौऱ्यात संग्रामसिंह जाधवराव ,माजी लोकनियुक्त नगराध्यक्षा राणीताई माने , मा.गटनेते तथा नगरसेवक आनंदाभाऊ माने, ,मा,नगरसेविका छायाताई मेटकरी, मा.नगरसेवक माऊली तेली, मा.नगराध्यक्ष नवनाथभाऊ, उद्योगपती आनंद घोंगडे, मा . नगरसेवक अस्मिर तांबोळी, मा. नगरसेवक व, भाजपचे कार्यकारणी सदस्य ड.गजानन भाकरे ,मा. नगरसेवक माऊली तेली ,मा नगरसेवक सोमेश यावलकर ,भाजपचे ज्येष्ठ नेते वसंत सुपेकर, भाजपचे तालुका चिटणीस डॉ. मानस कमलापुरकर ,भाजपचे शहराध्यक्ष प्रवीण जानकर ,भाजप शहराध्यक्ष अनिता बेले, चेअरमन लतिका मोटे, भाजपचे नेते आनंद फाटे, मेजर आनंदा व्हटे ,भाजपच्या नेत्या शितल लादे,,युवा नेते काशिलिंग गाडेकर ,मायाका प्रतिष्ठानचे अध्यक्ष काशिलिंग गावडे, अरुण पाटील, कीर्तीपाल बनसोडे, सूर्यकांत मेटकरी, समाधान नरुटे सागर नरुटे ,काकासाहेब लेंगरे, विशाल वाघ ,सोमनाथ ठोकळे , राहुल दिवटे ,सुनील पवार, शिवाजी गावडे, जय बनसोडे, ऋषी जानकर, समीर पाटील, अनुराधा माने, सुवर्णा जाधव ,अश्विनी दोलतडे,सुवर्णा गडदे, करिश्मा मुजावर, ललिता खाडे , फर्जाना मुजावर, अरुणा माने, रुकसाना मुजावर, शोभा जाधव, मनीषा दहिवडकर ,यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.


# गोंडवाना विद्यापीठाच्या युनिकनेक्ट ॲपचे लोकार्पण

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक,रोजगार व इतर अनुषंगिक माहिती मिळणार एका क्लिकवर

**गडचिरोली । प्रतिनिधी**

युनिकनेक्ट हे एक व्यापक व्यासपीठ आहे. जे विद्यार्थ्यांना शैक्षणिक संसाधने, रोजगाराच्या संधी आणि वैयक्तिक विकासासाठी वनस्टॉप सोल्यूशन प्रदान करून उच्च शिक्षणात क्रांती घडवून आणण्यासाठी तयार करण्यात आले आहे. युनिव्हर्सिटी कनेक्ट पच्या माध्यमातून सर्व विद्यापीठे, महाविद्यालये आणि विद्यार्थी जोडणे सोपे झाले आहे. तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक, रोजगार व इतर अनुषंगिक माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.







या ॲपचे लोकार्पण गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्र-कुलगुरु डॉ.श्रीराम कावळे, कुलसचिव डॉ.अनिल हिरेखन, युनिकनेक्ट पचे संस्थापक शुभम पाटील, सोहम खराबे, असिस्टंट प्रोग्रामर प्रमोद बोरकर आदी उपस्थित होते.


या पच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक माहिती जसे, विद्यापीठ व संलग्नीत सर्व महाविद्यालयाचे नोटिस, परीक्षा संबधीत माहिती, कार्यक्रमाचे परिपत्रक एका क्लिकवर एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम व मागील प्रश्नपत्रिका बघता येणार असून निकालाबाबतची माहिती जाणून घेता येऊ शकेल. त्यासोबतच, पमधील रेज्यूम बिल्डर हे फीचर विद्यार्थ्यांना त्यांचा रेज्यूम तयार करण्यास मदत करेल.

युनिकनेक्ट विद्यापीठाला प्रत्येक विद्यार्थ्यांशी जोडणारा एक प्लॅटफॉर्म आहे. हा विद्यार्थ्यांच्या रोजगार, शैक्षणिक प्रवासाला अधिक सुलभ व सोपा करण्यास मदत करेल. या प्लॅटफॉर्मवर विद्यापीठ, संलग्नीत महाविद्यालये आणि महाविद्यालयीन विद्यार्थी सर्व एकत्र आल्यामुळे विद्यार्थ्यांना लागणारी सर्व शैक्षणिक माहिती एकाच ठिकाणी व जलद गतीने त्यांच्या मोबाईलवर नोटिफिकेशनसहित उपलब्ध होणार आहे.त्यासोबतच रोजगार शोधक विद्यार्थी या प्लॅटफॉर्मवर जोडल्या गेल्यामुळे विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या संधी व उपलब्ध उद्योग कौशल्याची माहीती घेता येईल. नवीन शैक्षणिक धोरण (छएझ) अंतर्गत परीसरातील सर्व कंपन्यांना रोजगार आणि इंटर्नशिपसाठी सर्व विद्यार्थ्यांपर्यंत रोजगाराबाबत असलेल्या उपलब्ध संधीची माहिती पोहोचविता येईल. या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांचा पहिला ड्रीम जॉब त्यांच्याच स्थानिक परीसरामध्ये शोधायला मदत होईल.सदर प करिअर कनेक्ट, नोटिस बोर्ड, विद्यापीठ अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिका, निकाल, फीड्स आणि एआय-आधारित रेझ्युम बिल्डर यासारखी प्रमुख वैशिष्ट्ये उपलब्ध करुन देत विद्यापीठासाठी अधिकृत ॲप म्हणून काम करीत आहे. विद्यार्थ्यांची शैक्षणिक आणि उद्योग यांच्यातील दरी भरून काढणे, विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासात उत्कृष्ट होण्यासाठी सक्षम बनविणे आणि त्यांना उज्वल भविष्यासाठी तयार करणे हे युनिकनेक्टचे उद्दिष्ट आहे.युनिकनेक्ट प गुगल प्ले-स्टोअर, प्स स्टोअरवर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. सदर प डाऊनलोड केल्यानंतर विद्यार्थ्यांने स्वत:चा ई-मेल आणि मोबाईल क्रमांक टाकावा. मोगाईल क्रमांकावर प्राप्त ओटीपीसह प्रमाणीकरण केल्यानंतर अर्जदाराचे नाव प्रविष्ट करुन नोंदणी फॉर्म भरावे. त्यानंतर ड्रॉपडाउन मेनूमधून अर्जदाराने विद्यापीठ, महाविद्यालय, स्ट्रीम व चालू वर्ष निवडावे. त्यानंतर वापरकर्त्यास पच्या माध्यमातून उपयुक्त सुचना नियमित मिळत राहतील.

# नक्षलवाद्यांचा घातपाताचा डाव उधळला;पुरून ठेवलेली स्फोटके नष्ट







**गडचिरोली । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीदरम्यान घातपात घडवून आणण्यासाठी नक्षल्यांनी जमिनीत ६ कुकरमध्ये पुरून ठेवलेली ९ आयईडी आणि ३ क्लेमोर स्फोटके गडचिरोली पोलिसांनी नष्ट केली. नक्षलग्रस्त टिपागड टेकडी परिसरात विशेष नक्षलविरोधी पथक, केंद्रीय राखीव पोलीस दल, जलद प्रतिसाद पथक आणि बॉम्ब शोधक व नाशक पथकाने ही कारवाई पार पाडली.

लोकसभा निवडणूक शांततेत पार पाडण्यात गडचिरोली पोलिसांना यश आले. निवडणुकीदरम्यान नक्षल्यांकडून होणाऱ्या हिंसक कारवाया लक्षात घेऊन यावेळी पोलिसांनी विशेष नियोजन केले होते. त्यामुळे मोठा घातपात घडविण्याच्या उद्देशाने नक्षल्यांनी टिपागड परिसरात मोठ्या प्रमाणात पुरून ठेवललेली स्फोटके तशीच होती. दरम्यान, आज सोमवारी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी नक्षलाविरोधी पथक सी ६०, केंद्रीय राखीव पोलीस दल, जलद कृती पथक आणि बॉम्ब शोधक व नाशक पथकाला टिपागड परिसरात शोधमोहीम राबविण्याचे निर्देश दिले. यावेळी जवानांना स्फ़ोटकांनी भरलेले ६ प्रेशर कुकर, ३ क्लेमोर पाईप, गन पावडर, औषधे व इतर साहित्य आढळून आले. बॉम्ब शोधक पथकाने ९ आयईडी व ३ क्लेमोर घटनास्थळीच नष्ट केले.

# तेंदुपत्ता संकलन ला गेलेल्या ६२ वर्षीय महिलेवर अस्वलाचा हल्ला

**गोंडपिपरी । सुरज माडूरवार**

तेंदुपत्ता संकलनाला गेलेल्या ६२ वर्षीय महिलेवर अस्वलाचा हल्ला गोंडपिपरी - तेंदुपत्ता संकलन साठी जंगलात गेलेल्या एका ६२ वर्षीय महिलेवर अस्वलाने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची खळबळजनक घटना गोंडपिपरी तालुक्यातील सोमणपल्ली येथे घडली.जखमी महिलेचे नाव इंदुबाई तुळशीराम इजमनकर असे असून तिला उपचारासाठी चंद्रपूर जिल्हा रुग्णालयात रेफर करण्यात आले आहे.सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू असल्याने गावागावात तेंदुपत्ता संकलन करण्याचे काम सुरू झाले आहे. खाली दिवसात चार पैसे कमविण्यासाठी गावातील नागरिक हे पहाटेच्या सुमारास तेंदुपत्ता संकलन करून रात्री फडी वरती विकायला जातात.अश्यातच आज दिनांक ५ मे रोजी सकाळी ७.०० वाजता सोमणपल्ली येथील इंदुबाई तुळशीराम इजमनकर वय (६२) यांच्यासोबत गावातील काही महिला धाबा वन परिक्षेत्र क्रमांक १३३ येथे तेंदूपत्ता तोडण्यासाठी गेले असता दबा धरून असलेल्या अस्वलाने इंदुबाई यांच्यावराती हल्ला केला. घाबरलेल्या अवस्थेत सोबत असलेल्या



महिलांनी कसेबसे अस्वलाला पळवून लावले.यात इंदुबाई यांच्या डोक्याला,मानेला तसेच पायाला जबर दुखापत झाली.घटनेची माहिती होताच तबोडतोब ग्रामीण रुग्णालय गोंडपिपरी येथे दाखल करण्यात आले.वनविभागाला याबाबतची माहिती देण्यात आली. वणपाल एम. एन. गंदलवाड यांनी ग्रामीण रुग्णालय येथे भेट देऊन वरिष्ठांना घटनेचे माहिती दिली.प्राथमिक उपचारानंतर चंद्रपूर जिल्हा रुग्णालयात रेफर करण्यात आले.

# जि.प.उ.प्रा.शाळा.सावरी (बिड) शाळा पूर्व तयारी मेळावा संपन्न

**चिमूर । प्रतिनिधी**

शासनाकडून मार्च - मे, २०२२ मध्ये शाळापूर्व तयारी मेळावा' आयोजित करण्यासाठी सूचना देण्यात आल्या होत्या.त्यापूर्वी कोरोनाचा काळ होता. शाळा बंद असल्याचा परिणाम मुलांच्या शिक्षणावरही झालेला होता. मुलांना अंगणवाडी किंवा बालवाडीचा अनुभवच घेता आलेला नव्हता. या मुलांची व्यवस्थितपणे शाळापूर्व तयारी. होणे फार आवश्यक होते, ज्यामुळे पुढे जाऊन त्यांना वाचन-लेखन शिकताना कोणतेही अडथळे येणार नाहीत आणि ते व्यवस्थितपणे शिकू शकतील.या अभियानात गाव पातळीवर मुलांचे पालक, ग्रामपंचायत, अंगणवाडी, शाळा आणि स्वयंसेवक यांची मुख्य भूमिका असते.

जि.प.उ.प्रा.शाळा सावरी (बिड) शाळेत शाळा पूर्वतयारी मेळावा इयत्ता १ ली २०२४-२५ सत्र या शाळापूर्व मेळाव्याचे उद्घाटक शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मंगला





घानोडे,कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष गुणवंत नवले, तसेच प्रमुख पाहुणे शाळा व्यवस्थापन समिती सदस्य विठ्ठल घुमे, प्रदीप वाकडे, सविता सावरकर,प्रिया हिवंज,पोर्णिमा रामटेके,सुरेखा शेंबेकर आदी सदस्य गण उपस्थित होते.

शाळा पूर्व मेळावा मार्गदर्शन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मंगला घानोडे यांनी केले.यावर्षी सावरी (बिड)शाळेत १७ विद्यार्थी दाखलपात्र झाली. यावेळी एस.सी.चौधरी ,व्ही.बी सावसाकडे ,पी.एच.आत्राम ,राजेश मेश्राम यांनी, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांनी शाळेला सहकार्य करण्याचे आवाहन करून मोबाईल व दूरदर्शन पासून विद्यार्थ्यांना दूर ठेवणे आवश्यक आहे,असे सांगितले.शाळा पूर्व मेळावा प्रास्ताविक पी.व्ही.कुरेकार यांनी केले.एस.डी घोरुडे यांनी आभार मानले. या प्रसगी यशवंत शास्त्रकार शिक्षणप्रेमी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# चंद्रपूर जिल्ह्याच्या पाणीटंचाईसाठी ना.सुधीर मुनगंटीवार यांचा पुढाकार

## गावा-गावात जाऊन पाहणी करण्याच्या भाजपा कार्यकर्त्यांना सूचना

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

प्रचंड चटके लावणाऱ्या उन्हाळ्यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील जनतेच्या घशाला कोरड पडू नये, यासाठी राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार सरसावले आहेत. ना. मुनगंटीवार यांनी यासाठी भाजपच्या कार्यकर्त्यांना गावागावात जात पाणीटंचाईचा आढावा घेण्याचे आवाहन केले आहे. या संदर्भात त्यांनी चंद्रपूर भाजपाचे जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा यांना सूचना केली आहे.



लोकांची तहान भागवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने जल जीवन मिशनच्या माध्यमातून, 'हर घर कनेक्शन'चे ध्येय डोळ्यापुढे ठेवले आहे. या योजनेतून प्रत्येक गावात पाणीपुरवठा योजनांची कामे सुरू करण्यात आली आहे. पाणीपुरवठा करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा काम करत असली, तरी अशा योजना सुरू झाल्या की नाही, याची माहिती घेण्याची सूचना ना. मुनगंटीवार यांनी भाजपच्या कार्यकर्त्यांना केली आहे. जिल्ह्यातील बोअरवेल, विहिरी, हॅण्डपंप, वॉटर एटीएम, घरांमधील नळ कनेक्शन याबाबत सविस्तर माहिती घेण्यासोबतच ज्या भागात पाणीटंचाई आहेत, त्याची कारणे शोधण्यासही त्यांनी सांगितले आहे. चंद्रपूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागाला पाणीपुरवठा करण्यासाठी ८४५ स्वतंत्र पाणीपुरवठा योजना कार्यरत आहेत. यापैकी ज्या योजनांचे वीजबिल थकीत असेल ते तातडीने भरण्याच्या सूचना पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी प्रशासनाला यापूर्वीच दिल्या आहेत. संपूर्ण माहिती संकलित करण्यासाठी विशेष व्हॉट्सप क्रमांक (९५५२७९९६०८) सुरू करण्यात आला असून संबंधित माहिती त्यावर पत्र स्वरूपात पाठविण्याच्या सूचना कार्यकर्त्यांना देण्यात आल्या आहेत.

# घरफोडी करणारे चोर पुलगाव पोलीसाच्या जाळ्यात

**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील विक्की श्रवण अरोरा यांच्या घरी झालेल्या चोरीच्या आरोपीना जेरबंद करण्यात फुलगाव पोलिसांना यश आले आहे. याबाबत सविस्तर हकीकत अशी की विकी श्रवण अरोरा हे दिनांक २९ एप्रिल चे सायकांळी ०५/०० वा. शारदा माता म्हैयर मध्यप्रदेश येथे सहपरिवार दर्शनाकरीता गेले असता दिनांक ०२ मे रोजी सकाळी ०८/३० वा. दरम्यान घरी परत आले असता त्याच्या घरातील मेन दरवाजा कुलुप तुटलेला दिसता आतील दरवाजा सुध्दा तुटलेला दिसला तेव्हा त्यांनी घरात जावुन पाहीले असता घरातील आलमारीतील कपडे तसेच घरातील टि.व्ही खाली पडलेली दिसले व इतर घरगुती वस्तु फेकफाक करुन जमीनीवर अस्थाव्यस्त पडलेले दिसले. त्यावेळी फिर्यादी ने घरातील आलमारीची पाहणी केली असता आलमारीचे लाँकर खुले दिसुन आले लॉकर मध्ये ठेवुन असलेले ,दोन चांदीच्या तोरड्या वजन अंदाजे २० ग्रम वजनाची किमंत अंदाजे ८०००/-रु. , एक चांदीचा कडा ०५ ग्रम किमंत २०००/-रु. , दोन भरुन असलेले इंन्डेन कंपनीचे सिलंडर अंदाजे किमंत २०००/-रु. , दोन लहान मुलांचे गुलक्क त्यामध्ये अंदाजे किमंत ४०००/-रु. , बि.पी.आणि शुगर ची मशिन अंदाजे किमंत ४०००/-रु. , नगदी ६४०००/-रु. असा एकुण जुमला किमंत ८४०००/-रु. चा माल कोणीतरी अज्ञात इसमाने दिनांक २९ एप्रिल चे सायंकाळी ०५/०० वा. ते दिनांक ०२ मे चे सकाळी ०८/३० वा. दरम्यान घराचे गेटचे मेन दरवाजाचे कुलुप तोडुन आत प्रवेश करुन वर नमुद केलेल्या चिजवस्तु व नगदी रुपये चोरुन नेले अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन पुलगाव येथे अपराध क्रमाक ०४०१/२०२४ कलम ३८०,४५४,४५७ भा.द.वी.चा गुन्हा नोद करुन तपासात घेतला.



सदरचा गुन्हा पोलीस निरीक्षक . राहुल सोनवणे यांचे मार्गदर्शनात गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अमंलदार स.फौ.सुधिर लडके ब.क्र.१०३६ पोलीस स्टेशन पुलगाव हे तपास करीत असताना यातील आरोपी यश उर्फ शेशकुमार इंगळे वय २१ वर्ष , सुरेंद्र उर्फ मोंटु प्रमोदराव ढेंगे वय २४ वर्ष दोघेही रा.गांधी नगर पुलगाव ता.देवळी जि.वर्धा गांधी नगर पुलगाव येथुन ताब्यात घेवुन आरोपी क्र. १ यांनी कबुली निवेदन केल्याने मेमोरंडम पंचनामा कारवाई प्रमाणे दोन चांदीच्या तोरड्या अंदाजे वजन २० ग्रॅंम वजनाची अंदाजे किमंत ८०००/- रु. , एक चांदीचा कडा अंदाजे वजन ०५ ग्रॅम किमंत २०००/- रु. , एक भरुन असलेले सिलेंडर अंदाजे किमंत १०००/- रु. ,बि.पी.व शुगर मोजण्याचे मशिन अंदाजे किमंत ४०००/- रु. असा एकुण जुमला किमंत १५०००/-रु. तसेच आरोपी क्र. २ यांचे ताब्यातुन एक इणडेंन कंपनीचे सिलेंडर अंदाजे किमंत १०००/-रु. व चोरी करते वेळी कुलुप तोडण्यासाठी वारलेली लोखंडी सळाख अंदाजे किमंत १००/- रु. तसेच आरोपी क्र. १ व २ यांनी पो.स्टे.ला दाखल अपराध क्रमाक २४१/२०२४ कलम ३८०,४५७ भा.द.वी.चे गुन्ह्यातील चोरीस केलेला मुद्देमाल त्यांचे ताब्यातुन दोन मोबाईल फोन तसेच एक पिवळ्या धातुचे गळ्यातील पोत व दोन पिवळ्या धातुच्या कानातील बिऱ्या जप्त करण्यात आले.

सदरची कार्यवाही नरुल हसन पोलीस अधिक्षक.जिल्हा वर्धा, .डॉ.सागर कवडे अपर पोलीस अधीक्षक,.सहाय्यक पोलीस अधिक्षक पुलगाव श्राहुल चव्हाण यांचे मार्गदर्शनात राहुल सोनवणे पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन पुलगाव यांचे निर्देशाप्रमाणे गुन्हे प्रकटीकरणाचे अंमलदार सुधिर लडके ,रितेश गुजर, ओमप्रकाश तल्लारी,विश्वजीत वानखेडे यांनी केली आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .